# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./३४८५/२०२० दि. ०८/१२/२०२०

## परिपत्रक

विषय:- गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे प्रश्न सोडविण्याकरीता कॅम्प आयोजित करण्याबाबत.

संदर्भ :- १) कार्यालयीन पत्र जाक्र/गोवि/आस्था/३२६२/२०२०, दि.२०/११/२०२०.
२) मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयीन पत्र क्र. उशिनाग/सहसंचालक/आस्था/कॅम्प/५४४७/२०२०, दि. २१/११/२०२०.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य, यांना कळविण्यात येते की, मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी दि. १४/०९/२०२० रोजीच्या गडचिरोली दौऱ्यादरम्यान गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीशी संलग्नित महाविद्यालयांचे प्रश्न सोडविण्याकरीता दर महिण्याच्या तिसऱ्या शनिवारी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे कॅम्प आयोजित करण्याकरीता निर्देश दिलेले होते. त्याअनुषंगाने उक्त संदर्भ क्र. ०१ नुसार, गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे प्रश्न सोडविण्याकरीता शनिवार, दि. २१/११/२०२० रोजी सकाळी ११.०० ते सायं. ०४.०० पर्यंत शासकीय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली येथे कॅम्प आयोजित केले होते. तसेच यापुढेही दर महिण्याच्या तिसऱ्या शनिवारी उक्तबाबत कॅम्प आयोजित करण्यात येणार असून महाविद्यालयाशी संबंधित प्रश्न कॅम्पमध्ये उपस्थित राहून सादर करण्याबाबत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पत्र निर्गमित करण्यात आले आहे. करीता सर्व संलग्नित महाविद्यालयांनी कोव्हिड-१९ च्या पार्श्वभुमीवर केंद्र व राज्य शासन यांच्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन उक्तनुसार होणाऱ्या कॅम्पला वेळोवेळी उपस्थित राहून आपल्या महाविद्यालयाशी संबंधित प्रश्न सादर करावे.

07/12/2020

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर.
३. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४. मा. प्राचार्य, संलग्नित सर्व महाविद्यालये. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. विजय सिल्हारे)**
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली